जा.क्र:- नाजिसुरमं/अध्यक्ष/वि.भ.२०२३/..........
नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक.
१ ला मजला, झंन्कार हॉटेल गंजमाळ बस स्टॉप,
कामगार न्यायालयाजवळ, नाशिक ४२२ ००१.
दूरध्वनी क्र : ०२५३-२५९००३१.
दिनांक : ०२/०२/२०२३

## आदेश

**विषय :-सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुट प्राप्त सुरक्षा रक्षक/मुख्य सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक यांचे विषेशभत्ता/महागाई भत्त्यामध्ये दि. ०१.०१.२०२३ पासून सुधारणा करणेबाबत....**

**संदर्भ** : कामगार उप आयुक्त, (ग्रा.वि.) मुंबई यांचे पत्र क्र. ग्रा.वि. / कि.वे.अ. / वि.भ. / २०२३(१) / कार्या-१० दि. ०१.०२.२०२३ रोजीचे पत्र.

नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत **सुट प्राप्त** सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्याचे अधिकार **" महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत)** २००२ **मधील खंड** ३० **मध्ये**" नमूद करण्यात आलेले आहेत. त्यानुसार मंडळातील सुरक्षा रक्षकांच्या वेतनासाठी किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत "**दुकाने व व्यापारी आस्थापना**" या रोजगारासाठी पुनर्निर्धारित करण्यात आलेले किमान वेतनाचे दर आधारभूत प्रमाण मानून मंडळाने यापूर्वी मान्य केलेले आहेत. त्यानुसार उक्त अनुसुचित उद्योगधंद्यासाठी शासनाने वेळोवेळी जाहीर केलेला विषेश भत्ता मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना वेळोवेळी लागू करण्यात येत आहे.

क्र. ग्रा.वि. / कि.वे.अ. / वि.भ. / २०२३(१) / कार्या-१० किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत खालील अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता विशेष भत्त्याची रक्कम दि. ०१.०१.२०२३ ते दि. ३०.०६.२०२३ या कालावधीकरिता जाहीर करण्यात आलेली आहे. त्यानुसार "**दुकाने व व्यापारी आस्थापना**" या अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता **दि. ०१.०१.२०२३ ते ३०.०६.२०२३** या कालावधीकरिता जाहीर करण्यात आलेले विशेष भत्त्याचे दर नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक या मंडळाच्या नोंदणीकृत सुट प्राप्त सुरक्षा रक्षक/ मुख्य सुरक्षा रक्षक /सुरक्षा पर्यवेक्षक यांना लागू राहतील.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांना दि. ०१.०१.२०२३ पासून ते ३०.०६.२०२३ पर्यंत सुधारीत महागाई भत्त्यासह लागू करण्यात आलेले वेतन व भत्ते**

| अ.क्र. | पद | मुळवेतन | विषेशभत्ता/ महागाईभत्ता | घरभाडेभत्ता (३+४) ५% | प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | शैक्षणीक भत्ता | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | सुरक्षा पर्यवेक्षक | ११६३२ | २४४४ | ७०४ | १३०० | २९४ | ३०० | १६६७४ |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १०८५६ | २४४४ | ६६५ | १३०० | २९४ | ३०० | १५८५९ |
| ३ | सुरक्षा रक्षक | १००२१ | २४४४ | ६२३ | १३०० | २९४ | ३०० | १४९८[illegible] |

OPPO A53
2023.02.13 13:45

//२//

* किमान वेतन = मुळवेतन + विषेश भत्ता / महागाई भत्ता

सुट प्राप्त एजन्सी मालकांनी सुरक्षा रक्षक / **मुख्य** सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक/यांना पुढील प्रमाणे इतर फायदे/लाभ देणे बंधन कारक आहे.

१) **सानुग्रह अनुदान** : किमान वेतनाच्या १०% २) **उपदान** : किमान वेतनाच्या ४ % ३) **भरपगारी रजा** : किमान वेतनाच्या ६ % ४) **भरपगारी सुट्टी** : किमान वेतनाच्या १ %.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा अधिकारी यांच्या किमान वेतनावरील ३% लेव्ही दरमहा ५ तारखेपर्यंत मंडळात आर.टी.जी.एस. / DD द्वारे / धनादेशा द्वारे जमा करणे बंधन कारक आहे. सबब, मंडळातील सर्व नोंदीत सुट प्राप्त एजन्सी मालकांना या द्वारे असे सुचित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा अधिकारी यांना दि. ०१.०१.२०२३ पासून ते दि. ३०.०६.२०२३ पर्यंत सुधारीत वाढीव वेतनासह व विषेश भत्ता / महागाई भत्त्याच्या फरकासह रक्कम विनाविलंब सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा अधिकारी यांना अदा करावी. तसेच सुधारीत वेतनाबाबत प्रशासकीय सुट प्राप्त लेव्हीच्या फरकाची रक्कम मंडळाकडे विनाविलंब जमा करावी.**

कामगार उप आयुक्त तथा अध्यक्ष
नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ,
नाशिक.

नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ
महाराष्ट्र शासन स्थापित
नाशिक

प्रति, व्यवस्थापक
[redacted]
नाशिक.